**प्रेसनोट दिनांक ०३/०३/२०१९**

**शिवाजीनगर पोलीस स्टेशन पुणे**

इंदिरानगर पोलीस स्टेशन नाशिक शहर गुरनं ७९/१९ भादवि कलम ३६३ या गुन्हयातील अपहरण झालेली महीला नामे-मनाली निलेश बागूल, वय २६, रा.फ्लॅट न ०८, श्री माऊली अपार्टमेंट, वडाळा पाथर्डी रोड, नाशिक ही शिवाजीनगर एस.टी स्टँड येथे संशयीत इसमा सोबत येण्याची शक्यता असले बाबत इंदिरा नगर पोलीस स्टेशन चे तपासी अधिकारी पो.उप निरी.लोंढे यांनी फोनव्दारे शिवाजीनगर पोलीस स्टेशन येथे दिनांक ०३/०३/२०१९ रोजी रात्री ०३/०० वाजताच्या सुमारास कळवून सदर मुलीचे वर्णन सांगून व्हाटसअॅप वर मुलीचा फोटो पाठविला.

त्या प्रमाणे रात्रगस्ती करीता असलेले पोउपनि चव्हाण यांनी तात्काळ पिटर मोबाईल सह शिवाजीनगर एस टी स्टँड परिसरात जाऊन मिळालेल्या वर्णनाप्रमाणे व फोटोतील महीला दिसून येते अगर कसे या बाबत पाहणी केली असता, प्राप्त झालेल्या वर्णन व फोटो प्रमाणे एक महीला एस टी स्टँड परिसरात फिरत असल्याचे दिसल्याने तिस महीला कर्मचारी मपोना कारंडे यांच्या मदतीने ताब्यात घेऊन तिचेकडे अधिक विचारपूस केली असता तिने तिचे नाव मनाली निलेश बागूल, वय २६,रा.लॅट न ०८, श्री माऊली अपार्टमेंट, वडाळा पाथर्डी रोड, नाशिक असे असल्याचे सांगीतल्याने पोउपनि चव्हाण यांची खात्री झाली की, पोउपनि लोंढे यांनी दिलेल्या वर्णनाची व फोटोतील महीला तीच असल्याने तात्काळ पोउपनि लोंढे यांच्याशी संपर्क साधून ताब्यात घेतलेल्या महीलेस तिचे काकांचे ताब्यात सुखरुप रित्या दिलेले आहे.

वरिल नमूद कामगिरी ही बाळासाहेब कोपनर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, शिवाजीनगर पोस्टे यांच्या मार्गदर्शनाखाली व सुचना प्रमाणे पोउपनि संदीप चव्हाण, पोशि.राऊत, पोशि.खैरनार, पोशि.ठाकरे, मपोना कारंडे व कुंभार यांनी केलेली आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक,<br>
शिवाजीनगर पोलीस स्टेशन पुणे